दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.२४ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १२१ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Wesnesday 24 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 121 | Pages 4 | Rate 4 Rs

## युती का झाली नाही याचे उत्तर नीलेश राणेंकडेच आहेत

**मुंबई**–शिवसेना शिंदे गटाचे नेते नीलेश राणे यांनी असे म्हटले होते की सिंधुदुर्गात राणे साहेबांचा शब्द पाळला गेला नाही. यावर प्रतिक्रिया देताना नितेश राणे म्हणाले, मुळात महायुती का झाली नाही, याचा विचार आदरणीय नीलेशजींनी करायला पाहिजे. त्यांच्याकडेच उत्तर देखील आहेत. नीलेश राणे यांना आमदार बनवण्यात भाजपच्या तसेच शिवसेनेच्या सगळ्याच कार्यकर्त्यांचा पाठिंबा होता. मग ११ महिन्यात, आमदार झाल्यापासून आत्तापर्यंत ज्या पद्धतीने भाजपच्या कार्यकर्त्यांना वागवले गेले. त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांना वाटले की आम्हाला धमक्या शिव्या-शापच दिल्या जात असतील तर त्यांचे म्हणणे झाले की आम्ही आमचा अपमान सहन करत आलो आहोत, मग आम्ही त्यांच्यासोबत युती का करावी? त्यामुळे स्वबळाचा निर्णय घेण्यात आला.

# नगरपालिका निवडणुकीत भाजपने मोडले ३० वर्षांचे रेकॉर्ड: ४८ टक्के नगरसेवक एकट्या पक्षाचे

## विजयाचे खरे मानकरी कार्यकर्ते–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### विजयाने मातणार नाही, माजणार नाही

आपण जिंकलेली सगळी शहरे आणि न जिंकलेल्या शहरांमध्ये आपण चांगले काम करु आणि परिवर्तन घडवून आणू. जी चांगली सुरुवात झाली आहे त्याचे प्रतिबिंब महापालिका निवडणुकांच्या निकालांमध्येही दिसेल याबाबत मला खात्री आहे. विजयाने मातणार नाही, माजणार नाही हा आपला संकल्प असला पाहिजे. निवडणुकीतला विजय ही आपल्या कामांची पोचपावती असते असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

### विरोधकांचे बालेकिल्ले केले उद्ध्वस्त

नागपूर जिल्ह्यातील विजयावर भाष्य करताना फडणवीस यांनी 'सावनेर'चा विशेष उल्लेख केला. आम्ही सावनेर नगरपालिका पूर्णपणे काँग्रेसमुक्त केली आहे. जे नेते आपल्या बालेकिल्ल्यावर वर्षानुवर्षे अधिकार सांगत होते, त्यांचे किल्ले आमच्या कार्यकर्त्यांनी उद्ध्वस्त केले आहेत. काटोलचा अपवाद वगळता जिल्ह्यातील जवळपास सर्वच नगरपालिकांमध्ये भाजपने निर्भेळ यश मिळवले आहे. हा विजय म्हणजे नागरिकांनी आमच्या सरकारवर आणि कामावर दाखवलेला विश्वास आहे, असे फडणवीस म्हणाले.



नागपूर (वृत्तसंस्था)–राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत महायुतीने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष आज नागपुरातील 'रामगिरी' बंगल्यावर पाहायला मिळाला. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने एकट्याने २०० पेक्षा अधिक नगराध्यक्ष निवडून आणत विरोधकांचा सुपडा साफ केला आहे. महाराष्ट्रात भाजपच नंबर एकचा पक्ष आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले असून, राज्यातील ७५ टक्के नगराध्यक्ष महायुतीचे निवडून आले आहेत. महाविकास आघाडीच्या ५० च्या विरोधात आमचे २१० नगराध्यक्ष निवडून आले असून, आम्ही विरोधकांचे किल्ले उद्ध्वस्त केले आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना लक्ष्य केले.राज्यात झालेल्या नगरपरिषद आण नगरपंचायत निवडणुकींमध्ये महायुतीने घवघवीत यश संपादन केले. या निवडणुकीत भाजपचे सर्वाधित २०७ नगराध्यक्ष निवडून आलेत. निवडणुकीतील विजयानंतर नागपूरमधील भाजपचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवक यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या विजयाबद्दल देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपुरातील रामगिरी बंगल्यावर या विजयी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

### नगरसेवकांच्या संख्येत ऐतिहासिक भर

देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे १५०० नगरसेवक निवडून आले होते. मात्र, यावेळी हा आकडा दुपटीने वाढून ३ हजारांच्या पार गेला आहे. राज्यातील एकूण नगरसेवकांच्या ४८ टक्के नगरसेवक एकट्या भाजपचे आहेत. गेल्या तीस वर्षांतील निवडणुकींचा विचार केल्यास, एवढ्या मोठ्या संख्येने एकाच पक्षाचे नगरसेवक निवडून येण्याची ही पहिलीच वेळ असून, एक रेकॉर्ड आहे. ही किमया केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वास आणि विकासाचे जे राजकारण सुरू केले, त्याला नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादामुळेच शक्य झाली आहे.

### खरे मानकरी पक्षाचे कार्यकर्तेच

विजयाचा जल्लोष साजरा होत असताना फडणवीस यांनी या यशाचे संपूर्ण श्रेय पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना दिले. कालपासून अनेक लोक माझे अभिनंदन करत आहेत, पण या विजयाचा खरा मानकरी मी नसून तुम्ही सर्व कार्यकर्ते आणि नवनिर्वाचित प्रतिनिधी आहात. तुमच्या मेहनतीमुळेच भाजपला हा अभूतपूर्व जनादेश मिळाला आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

# प्रेमासाठी वाट्टेल ते म्हणीत तरुणी घरात घुसली!

## मुला सोबत मैत्रीचे संबंध असलेली तरुणी घरात घुसली : तरुणी विरुद्ध पोलिसात तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील एका गावातील एका सरकारी नोकर असलेल्या तरुणा सोबत मैत्रीचे संबंध असलेल्या तरुणीचे सबंध तोडण्याचे नोटरीद्वारे शपथ पत्र लिहून घेऊन सबंध तोडण्याचे करार झालेला असतानाही ती तरुणी पुन्हा त्या तरुणाच्या घरात घुसली आणि त्याच्या दरवाजावर थुंकली. म्हणून त्या तरुणी विरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील ढाकेफळ येथील एक तरुण हा लातूर येथे सरकारी नोकरी करीत आहे. दि. १४ डिसेंबर रोजी त्या सरकारी नोकर असलेल्या तरुणाच्या लहान भावाची लग्नाची सुपारी फोडण्याचा कार्यक्रम सुरू होता. त्या वेळी त्या सरकारी नोकर असलेल्या साहेबांचे त्याच गावातील मैत्रीचे संबंध असलेली एक तरुणी घरात येऊन तिने गोंधळ घातला. त्या नंतर उपस्थितांनी त्या मुलीची समजूत काढून नातेवाईकांनी त्या दोघांतील मैत्री पूर्ण सबंध इथून पुढे संपुष्टात आले असल्याचे नोटरी करुन एक शपथ पत्र तयार करून घेतले. दरम्यान दि. २२ डिसेंबर रोजी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास ती तरुणी पुन्हा तिच्या मित्राच्या घरात घुसुन दरवाजावर थुंकली. तिला तिचा मित्र असलेल्या तरुणाच्या वडिलांनी दरवाजावर थुंकण्याचा जाब विचारला असता तिने मुलाच्या आई-वडीलांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांना म्हणाली की, मी आता याच घरात राहणार आहे. एक तर मी मरेन अथवा तुम्हाला जिवेच मारीन. ती या घरातुन जाणार नाही. तुम्हाला काय करायाचे ते करा. असे म्हणुन धमकी देवुन निघुन गेली. या प्रकरणी त्या मुलीच्या मित्राच्या वडिलांच्या तक्रारी वरून त्याच्या मैत्रिणी विरुद्ध युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गु. र. नं. ३२१/२०२५ भा. न्या. सं. ३५१(२), ३५२, ३३३ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या मैत्रीपूर्ण प्रकरणाचा तपास युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल केशव खाडे हे करीत आहेत.

### नोटरीकडे लिखापढी झाली पण!

तरुण तरुणी मधील मैत्रीपूर्ण सबंध संपुष्टात आल्याचे दोघांनी दिलेले शपथपत्र ही नातेवाईकांच्या दबावातून घेतले गेले असावे आणि जर पुढे काही अघटीत घडले तर नोटरी आणि त्यावरील साक्षीदार सुद्धा गोत्यात येऊ शकतात!



# तेरा वर्षाच्या अल्पवयीन शाळकरी मुलीचा विनयभंग

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यात एका तेरा वर्षाच्या शाळकरी अल्पवयीन मुलीचा शेतात कोणी नसताना एका २० वर्ष वयाच्या तरुणाने विनयभंग केल्याची घटना उघड झाली असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दि. २१ जुलै रोजी दुपारी एक तेरा वर्षाची पीडित अल्पवयीन मुलगी ही शाळेला सुट्टी असल्याने तिच्या शेतात गेली होती. त्याच वेळी त्यांच्या शेजारी शेत असलेल्या बालाजी भांगे या तरुणाने तिच्या हाताला धरुन तिचा विनयभंग केला. जर हा प्रकार कुणाला सांगितला तर जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी अल्पवयीन मुलीच्या तक्रारी वरून बालाजी दिलीप भांगे याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ६९८/२०२५. भा. न्या. सं. ७४, ११८(२), ३५१(२), ३५२ यासह पोक्सो कलम ८, १२ नुसार गुन्हा दाखल झालेला असून पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत.



# सोयाबीन,तूर,कापसाच्या भाव वाढी साठी बीड जिल्हाधिकारी कार्यालया वर गुरुवारी शेतकरी हक्क मोर्चा धडकणार!

## शेतकरी हक्क मोर्चा आंदोलन समितीची पत्रकार परिषद संपन्न

दैनिक वादळ वाता
**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून जात असून शेतीमालाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.विशेषतः कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने गुरुवार दि.२५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा,ते बीड जिल्हाधिकारी कार्यालया वर भव्य शेतकरी हक्क मोर्चा काढण्यात येणार असल्याचे समितीचे शेतकरीपुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, कुलदीप करपे डॉ.गणेश ढवळे,गणेश मस्के,सुहास जायभाय,अर्जुन सोनवणे, राजू गायके,अण्णासाहेब राऊत यांनी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत सांगितले.शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.शेतकऱ्यांच्या कापसाला किमान १२००० प्रति क्विंटल भाव देण्यात यावा. सोयाबीन साठी किमान ७००० प्रति क्विंटल दर निश्चित करण्यात यावा. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (CCI) कडून होणारी अडवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा.हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या बाजारसमित्या व व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या शेतमाला चा विक्रीदर व खरेदी दरातील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा.शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना,सबसिडी, ठिबक,तुषार सिंचन अनुदान व पीक विमा यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी.या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल,असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.




# मोफत रुग्ण सेवा करून दिवंगत आईला व्यक्त केली आदरांजली

## सलग आठ वर्षा पासून घेतले जाते पुण्यस्मरण दिना निमित्त मोफत आरोग्य शिबिर

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

आपल्या दिवंगत आईच्या पुण्यस्मरणा निमित्त त्यांची आठवण कायम राहावी आणि त्या निमित्त गोरगरीब व गरजू रुग्णांना सेवा मिळावी म्हणून दर वर्षी प्रसिद्ध कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. आकाश बचुटे आणि त्यांच्या कुटुंबांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिर आयोजित केले होते. मागील आठ वर्षा पासून हा सिलसीला सुरू ठेवलेला आहे. या शिबिरात कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. आकाश बचुटे यांनी शेकडो रुग्णांची तपासणी करून श्रद्धांजली अर्पण केली.

कळंब येथे आशा कान-नाक-घसा हॉस्पिटलचे प्रसिद्ध डॉ. आकाश बचुटे हे त्यांच्या मातोश्री कालकथीत आशाबाई बचुटे यांचे दि २८ डिसेंबर २०१४ रोजी निधन झाले. यांच्या पुण्यस्मरण दिना निमित्त त्यांचे चिरंजीव आणि प्रसिद्ध कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. आकाश बचुटे आणि त्यांच्या परिवाराच्या वतीने हे सन २०१८ पासून दर वर्षी नियमित कान-नाक-घसा यांचे मोफत तपासणी शिबीर आयोजित केले जाते.



दरम्यान सोमवार दि. २२ डिसेंबर रोजी कान-नाक आणि घसा संबंधी विविध आजारांचे मोफत तपासणी व उपचार शिबर आयोजित केले गेले. या मोफत शिबिरात डॉ आकाश बचुटे यांनी रुग्णांची तपासणी करून दिवंगत मातोश्री कालकथीत आशाबाई बचुटे यांना आदरांजली अर्पण केली. या शिबिराचे उद्घाटन त्यांचे वडील आणि भारतीय सैन्य दलातून सेवा निवृत्त झालेले कॅप्टन (ऑनररी) रावसाहेब बचुटे, पत्रकार गौतम बचुटे, बलभीम बचुटे अन्प्राआ अशोक बचुटे यांच्या उपस्थितीत दिवंगत आशाबाई बचुते यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व आदरांजली अर्पण करून करण्यात आले. या शिबिरात प्रामुख्याने कानाचे विविध आजार ज्यात कानातून पू-येणे. कानामध्ये सर्दी जमा होणे. कानामध्ये मळ, बुरशी होणे. कानाच्या पडद्यावर छिद्र व कानाची पाळी फाटलेली असणे. जन्मतः कानाचा नासूर, काना वरती सूज व गाठी असणे. कानामध्ये सतत आवाज येणे, चक्कर येणे, कमी ऐकु येणे तसेच मुल जन्मतः मुक व बधिर असणे यासह नाकाचे आजार ज्या मध्ये नाकाचे हाड व मांस वाढणे. लर्जी, सर्दी सायनस ही लक्षणे. तसेच डोके व डोळ्यांच्या मध्ये दुखणे. नाकातुन सतत पाणी येणे. दुर्गंध येणे व बाहेरील सुगंध दुर्गंध न समजणे. चेहरा सुजणे व दुखणे. श्वास बंद होणे, नाक कोंदणे, नाकातून रक्तस्राव होणे. नाकामध्ये फोड व फुनसी येणे यासह घशाचे आजार यात टॉन्सिल - गाठी असणे. थॉयरॉईड व मानेवर सुज असणे. जिभेवर अल्सर, पांढरे चट्टे असणे. गालावर पांढरे, काळे, लाल चट्टे असणे. ओठांवर व जिभेवर सुज, गाठ येणे. रात्री व दिवसा सतत खोकला येणे, ढास लागणे. लहान मुलांमध्ये नाकाचे टॉसिन्ल असणे. तोंडातील कॅन्सरची गाठ व जखम असणे. सतत आवाज बसणे. आवाज घोगरा येणे. मानेवर विविध प्रकारच्या गाठी असणे. या आजारांची तपासणी करण्यात आली.

# तोरणमाळच्या डोंगरदऱ्यात घुमला शिक्षणाचा जागर; नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी विद्यालयात 'पालक मेळावा' उत्साहात

## शाळेच्या विकासासाठी रुग्णवाहिका व निवासी वैद्यकीय पथकाची घोषणा; २२ गावांतील पालकांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**



नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला दिशा देण्यासाठी आणि शाळा-पालक यांच्यातील नाते अधिक घट्ट करण्यासाठी, नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी विद्यालय, तोरणमाळ येथे 'विद्यार्थी-पालक मेळावा २०२५' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. २२ गावांतील पालकांच्या विक्रमी उपस्थितीने या कार्यक्रमाला एका मोठ्या उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी सादर केलेल्या बहारदार लेझीम नृत्याने आणि पारंपरिक स्वागताने झाली. आदिवासी संस्कृती आणि शिक्षणाची ओढ यांचा सुंदर संगम यावेळी पाहायला मिळाला. जिल्हा परिषदेचे शिक्षण व अर्थ सभापती गणेश पराडके यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. मेळाव्याचे मुख्य अतिथी गणेश पराडके यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी त्यांनी शाळेला स्वतंत्र रुग्णवाहिका (म्ब्युलन्स), निवासी वैद्यकीय पथक आणि आशा वर्करची नियुक्ती करण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे दुर्गम भागातील पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामदास जाधव यांनी केले, तर सूत्रसंचालन सचिन पत्की यांनी प्रभावीपणे सांभाळले. विद्यालयाचे प्राचार्य राजाराम वळवके यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला. त्यांनी सांगितले की, डिजिटल शिक्षण आणि गुणवत्ता वृद्धीच्या जोरावर या विद्यालयाला राज्यातील प्रथम क्रमांकाचे निवासी विद्यालय बनविण्याचा आमचा संकल्प आहे. विशेष म्हणजे, पालकांशी त्यांच्या स्थानिक बोलीभाषेतून संवाद साधत मुलींच्या शिक्षणाचे आणि नियमित उपस्थितीचे महत्त्व पटवून देण्यात आले. या प्रसंगी पालकमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक वाणी, गटशिक्षणाधिकारी डी.डी. राजपूत, शिक्षण विस्तार अधिकारी दीपिका बारी, केंद्रप्रमुख कोमलसिंग पाडवी, सरपंच सीताराम यांसह शिक्षण विभागातील विविध अधिकारी व स्थानिक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सर्व पालकांसाठी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाने झाली. शिक्षण, संस्कार आणि समाजहित जोपासणारा हा मेळावा तोरणमाळ परिसरासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# ६१ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

## महिलांमध्ये धाराशिव तर पुरुषांमध्ये पुणे अजिंक्य; धाराशिव-पुण्याचा राज्यात दबदबा

## पुरुषांत पुण्याची हॅट्रिक, महिलांत धाराशिवचे सलग दुसरे जेतेपद पुण्याचा शुभम थोरात व धाराशिवची अश्विनी शिंदे ठरले अष्टपैलू





दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड येथील श्रीमती योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात पार पडलेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महिलांच्या गटात धाराशिव तर पुरुषांच्या गटात पुणे संघाने विजेतेपद पटकावत आपला दबदबा कायम राखला. पुरुष गटात पुण्याने सलग हॅट्रिक साधली, तर महिलांमध्ये धाराशिवने सलग दुसऱ्या वर्षी राज्य अजिंक्यपदावर आपले नाव कोरले. या स्पर्धेत पुण्याचा शुभम थोरात आणि धाराशिवची अश्विनी शिंदे अष्टपैलू खेळाडू ठरले.

**महिला अंतिम सामना : धाराशिवची पुण्यावर थरारक मात**

महिलांच्या अंतिम सामन्यात धाराशिव विरुद्ध पुणे अशी चुरशीची लढत पाहायला मिळाली. अखेर धाराशिवने पुण्यावर २८-२६ असा २ गुणांनी निसटता विजय मिळवत अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केले. सामन्यात दोन्ही संघांना ड्रीम रनचे प्रत्येकी ४ गुण मिळाले. धाराशिवकडून मैथिली पवार (१.५२, १.२० मि. संरक्षण व ६ गुण), अश्विनी शिंदे (२.२०, २.५० मि. संरक्षण व ४ गुण), संध्या सुरवसे (१.५० मि. संरक्षण व ४ गुण), संपदा मोरे (२.१० मि. संरक्षण व २ गुण), सुहानी धोत्रे (१.२० मि. संरक्षण व २ गुण) यांनी संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. पुण्याकडून प्रियांका इंगळे (२.१०, १.५० मि. संरक्षण व ४ गुण), कोमल धारवाटकर (१.४० व १.२० मि. संरक्षण), श्वेता नवले (नाबाद १.२० व २.०० मि. संरक्षण), भाग्यश्री बडे (६ गुण) यांनी झुंजार खेळ करत सामना शेवटपर्यंत रंगतदार ठेवला.

**पुरुष अंतिम सामना : पुण्याचा मुंबई उपनगरवर कडवा विजय**

पुरुषांच्या अंतिम सामन्यात पुणे विरुद्ध मुंबई उपनगर अशी प्रतिष्ठेची लढत झाली. मध्यंतराला दोन्ही संघ १६-१६ अशा बरोबरीत होते. मात्र अखेरच्या क्षणी पुण्याने संयम राखत मुंबई उपनगरवर ३४-३२ असा २ गुणांनी निसटता विजय मिळवून अजिंक्यपदाची हॅट्रिक साकारली. पुण्याकडून शुभम थोरात (१.४० मि. संरक्षण व ४ गुण), सुयश गरगटे (१.३० मि. संरक्षण व ८ गुण), रविकिरण कचवे (६ गुण), प्रतीक वाईकर (१.४० व १.१५ मि. संरक्षण) यांनी निर्णायक कामगिरी केली. मुंबई उपनगरकडून अनिकेत चेंदवणकर (१.४५, १.२५ मि. संरक्षण व ८ गुण), निहार दुबळे (१.१० मि. संरक्षण व ४ गुण), धीरज भावे (नाबाद १.३०, १.०५ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी प्रभावी खेळ करत शेवटपर्यंत झुंज दिली.

**अष्टपैलू कामगिरीने वेधले लक्ष**

या स्पर्धेत अष्टपैलू खेळाडूंच्या चमकदार कामगिरीने क्रीडारसिकांचे लक्ष वेधले. पुरुष गटात पुण्याच्या शुभम थोरातने तर महिला गटात धाराशिवच्या अश्विनी शिंदेने सातत्यपूर्ण खेळ करत संघाच्या यशात सिंहाचा वाटा उचलला.

**वैयक्तिक पुरस्कार विजेते**

राजे संभाजी पुरस्कार (अष्टपैलू खेळाडू) : शुभम थोरात (पुणे), उत्कृष्ट संरक्षक : अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर), उत्कृष्ट आक्रमक : सुयश गरगटे (पुणे)

अहिल्या पुरस्कार (अष्टपैलू खेळाडू) : अश्विनी शिंदे (धाराशिव), उत्कृष्ट संरक्षक : प्रियांका इंगळे (पुणे), उत्कृष्ट आक्रमक : मैत्री पवार (धाराशिव)

**बक्षीस वितरण : राज्य खो-खोला नवे तेज**

या स्पर्धेचे बक्षीस वितरण पोलीस अध्यक्ष नवनीत कॉवत, कामगार विमा संचालक डॉ.अशोक थोरात जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्याधर, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जे.पी शेळके ॲमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष श्री ऋषिकेश शेळके सचिव श्री विजय जाहेर यांच्यासह महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी तसेच अनेक पदाधिकारी, कार्कर्ते व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

विजयाचा थरार, खेळाडूंची जिद्द! अंतिम सामने महाराष्ट्र खो-खोला नव्या उंचीवर नेणारे अविस्मरणीय संग्राम ठरले. उत्कृष्ट आयोजन, खेळाडूंची झुंजार कामगिरी आणि शेवटपर्यंत रंगत टिकवणाऱ्या सामन्यांमुळे बीडमध्ये पार पडलेली ही राज्य अजिंक्यपद स्पर्धा महाराष्ट्र खो-खोच्या इतिहासात लक्षवेधी ठरली असून धाराशिव व पुण्याच्या यशाने राज्य क्रीडाक्षेत्रात नवे तेज निर्माण झाले आहे. उत्साही प्रेक्षकांच्या उपस्थितीत, उत्कृष्ट नियोजन आणि तुफानी संघर्षाने भरलेली ही स्पर्धा महाराष्ट्र खो-खोच्या वैभवशाली भविष्याची दिशा दाखवून गेली.

# शरदचंद्र विद्या मंदिर बीड येथे १४७ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

## महामानव अभिवादन ग्रुपचा उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाणदिनी महामानवाभिवादन ग्रुपला मिळालेल्या दानातून १४७ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) शरदचंद्र विद्या मंदिर बीड येथे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. छत्रपती शाहू महाराज,संत गाडगेबाबा, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. प्रमोद गायकवाड सर,प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक समर्थ राजयोग चे संपादक मा. वैभव स्वामी एस एस सोनवणे व महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले लाभले होते. ॲड.तेजस वडमारे, डी.एम राऊतव के.एस वाघमारे यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन इयत्ता ६ वी तील विद्यार्थिनी कुमारी अंजली समाधान ससाने हिने केले. प्रास्ताविक वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी वानखेडे यांनी करून महामानवाभिवादन ग्रुप राबवीत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. ६ व्या वर्गातील विद्यार्थिनी कुमारी तेजश्री दिनकर मस्के हिने आपल्या सुस्पष्ट व खणखणीत आवाजात महापुरुषांच्या जीवन कार्याबद्दल सांगितले की,आरक्षणाचे जनक व प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारे रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज, वंचितांसाठी शिक्षणाची दारे खुले करणारे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, अंधश्रद्धा,नशा-पाणी, कर्जबाजारीपणा पासून दूर रहा सार्वजनिक स्वच्छता व मनाची स्वच्छता याचे महत्व आपल्या अनमोल व सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत,कीर्तनातून बहुमोल उपदेश करणारे संत गाडगेबाबा व शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती होणार नाही तरी उच्च शिक्षण घेऊन त्या ज्ञानाचा उपयोग संपूर्ण देशाकरता करणारे, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या कार्याबद्दल व उपदेशांचे वाचन करून तसे जीवन जगून प्रगतीच्या मार्गावर आपल्या सर्वांनी वाटचाल करीत राहावे असे सांगितले तिचे या ओघवत्या व माहितीपूर्ण



भाषणाबद्दल सर्वांनी टाळ्याच्या गजरात तिचे कौतुक करून छत्रपती शाहू महाराजांचे जीवन चरित्र पुस्तक;वही पेन व पुष्पगुच्छ देऊन वाचाल तर वाचाल व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे मान्यवरांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे मा. वैभव स्वामी यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना स्पष्ट केले की महापुरुषांची जयंती; स्मृतिदिन का साजरी करावेत? कारण ते सर्वांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी केलेल्या कार्याची सतत आठवण ठेवून; आई-वडील आपल्या शिक्षणासाठी घेत असलेले कष्ट डोळ्यासमोर ठेवून उच्च शिक्षण घ्यावे. स्पर्धेच्या युगात जगण्याकरिता अभ्यासातील सातत्य, चिकाटी अपयशाला न घाबरता ध्येय प्राप्त करण्याकरिता पुस्तकांच्या सहवासात राहून ज्ञान प्राप्त करावे. ग्रंथ प्रेमी बना. इंटरनेट मोबाईलच्या जमान्यात त्याचा वापर अवशकते नुसार करावा. महामानव अभिवादन ग्रुप देत असलेले एक वही पेन हे प्रेरणादायी समजावे असा मोलाचा संदेश दिला. आयु.जी.एम भोले व एस एस सोनवणे यांनी देखील आपल्या बहुमोल उपदेशात विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेतील कर्तव्याची जाण करून दिली. अध्यक्ष आयुष्यमान प्रमोद गायकवाड यांनी शाळेच्या प्रगती करिता करीत असलेल्या कार्याबद्दल माहिती देऊन सुजाण नागरिक घडविण्यात शाळा व्यवस्थापन कमी पडणार नाही असा दृढ निश्चय व्यक्त केला व मुलांना पुढील वाटचालीसाठी मोलाचा उपदेश दिला.

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामुदायिक वाचन मा. वैभव स्वामी यांनी घेतले कार्यक्रमास विद्यालयाचे शिक्षक वृंद श्रीमती भोंडवे मॅडम, श्रीमती शेळके यु डी मॅडम, श्रीमती बनसोडे मॅडम, श्रीमती मुंडे मॅडम उपस्थित होत्या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री जे व्ही उनवणे यांनी व्यक्त केले.

संपादकीय

# जखम पायाला अन् औषध शेंडीला

राज्यात जुन्नर, नाशिक, नगर तसेच इतर काही जिल्ह्यांमध्ये गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने वाढ होत असलेल्या बिबट्यांच्या समस्येवरील उपाययोजनांमधील थातुरमातूरपणा आणि गांभीर्याच्या अभावामुळे सामान्यांचे जगणे संकटग्रस्त झाले आहे. त्यात बिबट्यांची नसबंदी करण्याचे ठरवले आहे. हा उपाय म्हणजे 'जखम पायाला अन् औषध शेंडीला' असा प्रकार आहे. हे बिबटे मुळात शेतीतलेच असल्याने समस्येची जटिलता वाढली आहे. म्हणूनच वन विभागाने या गंभीर प्रश्नावर उपाययोजना करताना ते मानवकेंद्रित राहतील, अशी काळजी घेणे आवश्यक आहे.राज्यात विशेषत: शेतीच्या क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून बिबटे व मानवाचा संघर्ष सुरू आहे. त्यातल्या त्यात पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या जिल्ह्यांमधील बागायती तसेच उसाचे क्षेत्र असलेल्या जिल्ह्यात ही समस्या गंभीर बनली असून सातत्याने वाढत आहे. नुकतेच जुन्नर विभागात बिबट्याच्या हल्ल्यात सलग चार बळी गेल्याने जनक्षोभ उसळला. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या वन विभागाच्या शूटर्सनी एका संशयित नरभक्षक बिबट्याला ठार केले. तसे पाहिले तर, फक्त बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये राज्यात आतापर्यंत सुमारे १२० जणांचा बळी गेला आहे. फक्त जुन्नर वन विभागात २०२० ते २०२५ दरम्यान बिबट्यांच्या हल्ल्यात सुमारे २४ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात याच काळात ही संख्या शंभरहून अधिक आहे. यावरून या समस्येच्या तीव्रतेत वाढच होत असल्याचे स्पष्ट होते. अनेक उपाययोजना करूनही हे प्रमाण कमी न होण्याचा अर्थ सरकारला आपल्या उपाययोजनांमध्ये क्रांतिकारी बदल करावे लागणार, हे स्पष्ट आहे. या समस्येवर उपाय म्हणून सरकारने आता जुन्नर विभागातील बिबट्यांची नसबंदी करण्याचे ठरवले आहे. हा उपाय म्हणजे 'जखम पायाला अन् औषध शेंडीला' असा प्रकार आहे. वन्यजीव व्यवस्थापनात जगात अद्याप कुठेही न घडलेला असा हा प्रकार आहे. बिबट्याच्या हल्ल्यात लहान मुलांचा सलग बळी गेल्याने अलीकडे जुन्नर परिसराबरोरच राज्यभर खळबळ उडाली. अर्थातच, या समस्येचे खापर वन विभागावर फोडले जात आहे. खरे तर, लहान मूल बिबट्याच्या हल्ल्यात बळी पडते, तेव्हा कुटुंबावर मोठा मानसिक आणि भावनिक आघात होतो. वन विभागाने अशा ठिकाणी तातडीने भेट देऊन कुटुंबाच्या सांत्वनाबरोबरच तातडीने आर्थिक भरपाई देण्याचे धोरण आखले. भरपाईची ही रक्कमही आता २५ लाख रुपये आहे. पण, त्यामुळे त्या कुटुंबाची हानी कशी भरून येणार या प्रश्नाचे उत्तर वन विभागाकडे नाही. तत्काळ उपाययोजनेचा भाग म्हणून अशा घटना घडलेल्या भागात पिंजरा लावून तेथील बिबटे पकडून दूर सोडण्याचेही वन विभागाचे धोरण आहे. पण, बिबट्यांची संख्या जास्त असते, तेथे एक बिबट्या उचलला, की त्याची जागा दुसरा बिबट्या घेत असतो. शिवाय दुसरीकडे सोडलेल्या बिबट्याने नवीन भागात गेल्यावर भांबावून जाऊन तेथे त्रास दिल्याची काही उदाहरणे आहेत. त्यामुळे असे करणे म्हणजे फक्त समस्येचे स्थलांतर असल्याचा काही वन्य जीव अभ्यासकांचा आक्षेप असल्याने हा उपाय थांबवण्यात आला. कारण पकडलेला बिबट्या सोडायचा नाही, म्हटल्यावर पोषणाचा खर्च कोणी करायचा, हाही प्रश्न निर्माण झाला.शेतीक्षेत्रातील बिबट्यांच्या समस्येवर उपाययोजना करताना त्या 'मानवकेंद्रित' नसल्याचा हा पुरावा आहे. कारण पकडल्या गेलेल्या बिबट्याच्या पुनर्वसनाचा प्रश्न विचारात घेतला गेला. मुळात बिबट्यांची तीव्र समस्या असलेल्या जुन्नर, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील भाग प्रादेशिक वन विभागाच्या अंतर्गत येतात. येथे चालणाऱ्या कामांशी बिबट्याच्या व्यवस्थापनाचा काहीही संबंध नाही. त्यामुळे बिबट्यांच्या समस्येवर उपाययोजना करताना प्रशिक्षित मनुष्यबळ आणि साधनांचा प्रचंड तुटवडा आहे. तात्पुरता उपाय म्हणून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावायचा म्हटला, तरी त्यात बिबट्याला आमिष म्हणून कुत्रा किंवा शेळी ठेवली जायची. तिचा बळी जायचा. त्यावेळी पर्यावरण चळवळीतील कार्यकर्त्या आणि माजी केंद्रीय मंत्री मनेका गांधी यांनी पिंजऱ्यात आमिष म्हणून ठेवलेल्या प्राण्यावर हा एक प्रकारे अन्याय असल्याचा आक्षेप घेतला. त्यामुळे पुन्हा पिंजऱ्यात आमिषासाठी स्वतंत्र कप्पा तयार करावा लागला. शिवाय एकदा पिंजऱ्यात अडकल्यानंतर बिबट्या व तो प्राणी यांच्यात भक्कम भिंतवजा पडदाही तयार करावा लागला. अशा अनेक समस्या आहेत. अर्थातच, अशा अडथळ्यांमुळे या समस्येचे कधीच पूर्ण निराकरण झाले नाही. उलट, धोरणलकवा आणि उपाययोजनांच्या अंमलबजावणीमध्ये आलेल्या शिथिलतेमुळे या समस्येची तीव्रता पुन्हा वाढली. त्यातूनच आता या भागातील बिबट्यांच्या नसबंदीचा नवीन उपाय काहींनी शोधला आहे. अर्थात नसबंदीमुळे काही बिबट्यांच्या पुढील पिढीच्या निर्मितीला पायबंद बसेल, पण हेच बिबटे पुन्हा त्याच भागात सोडल्यावर समस्या निर्माण करणार नाहीत, याची खात्री कोण देणार? ठरावीक भागातच बिबट्यांची संख्या का वाढते, याचा अभ्यास झाला आहे. त्यानुसार उसामुळे मिळणारे लपण, जवळच असलेल्या गावातील भटकी कुत्री, पाळीव डुकरे, मांजरे यांच्या रूपाने सहज उपलब्ध होणारे खाद्य आणि पाणी यामुळे बिबटे अशा भागांमध्ये स्थिरावून वेगाने वाढत असल्याचे स्पष्ट झाले. जंगलांमधील अन्न कमी झाल्याने हे बिबटे जवळच्या जंगलांमधून बाहेर आल्याचा सिद्धांत चुकीचा आहे. शेतीच्या भागातील बिबटे तसे मूळचे तेथीलच आहे. फक्त उसाचे क्षेत्र वाढल्यानंतर त्यांची संख्या झपाट्याने वाढल्याचे या संदर्भातील अभ्यासात स्पष्ट झाले आहे. त्यातच बिबट्या हा तसा संधिसाधू आणि अत्यंत प्रतिकुल परिस्थितीशी जुळवून घेणारा प्राणी आहे. वेळप्रसंगी तो अगदी सरडा किंवा बेडूकही खाऊन जगू शकतो. जंगलात बिबट्याच्या पिल्लांना अनेक नैसर्गिक शत्रू असतात, त्यामुळे त्यांची संख्या मर्यादित राहते.शेतीक्षेत्रात बिबट्यांच्या पिल्लांना नैसर्गिक शत्रू नसणे, हे त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होण्यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. जुन्नर विभागातील बिबट्यांची संख्या बेसुमार वाढल्याने त्यातील काही बिबट्यांनी जुन्नर तालुक्याला लागून असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेरसारख्या दुष्काळी तालुक्यात स्थलांतर केले. विशेष म्हणजे, या भागातही ते स्थिरावले आहे. त्यामुळे भविष्यात या भागातही बिबट्यांची तीव्र समस्या निर्माण झाल्यास आश्चर्य वाटू नये. पिंजऱ्यातील शेळी किंवा कुत्र्यावरील भावनिक अत्याचारांचा विचार करणाऱ्या स्वयंसेवी संस्था ज्यांच्या घरातील एकुलतं एक मूल बिबट्याच्या हल्ल्यात बळी जाते, त्यांच्याबाबत एकही अक्षर उच्चारताना दिसत नाहीत. प्राण्यांच्या हक्कांबद्दल उच्चरवाने बोलणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक हितसंबंध आता उघड झाले आहेत. वनविभागाने बिबट्यांसाठी माणिकडोह येथे बिबट्या निवारण केंद्र उभे केले. येथे ८० बिबटे आहेत. त्याच्या उभारणीसाठीचा सर्व खर्च वन विभागाने केला. वन विभागाने काही वर्षे व्यवस्थित चालवल्यानंतर हे केंद्र दिल्लीच्या 'वाईल्डलाईफ एसओएस' या स्वयंसेवी संस्थेला चालवण्यास देण्यात आले. त्यासाठी संबंधित संस्थेने वन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरले. या केंद्राला भेट देण्यासाठी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनाही परवानगी घ्यावी लागते, यावरून या संस्थांची कार्यपद्धती स्पष्ट होते. आताही शिरूरजवळ सुमारे दोनशे बिबट्यांसाठी निवारा केंद्र उभारणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले. उभारणीनंतर ते चालवण्यासाठी पुन्हा स्वयंसेवी संस्थेस दिले जाईल. म्हणजे केंद्र उभारणार सरकार आणि ते चालवणार स्वयंसेवी संस्था, असा खेळ आहे. त्यामुळे अशी केंद्रे उभारताना ती बिबट्यांच्या सोयीसाठी आहेत की स्वयंसेवी संस्थांचे हितसंबंध जोपासण्यासाठी, हा प्रश्न यातून निर्माण झाला आहे. बिबट्याही वन्य जीव अधिनियम सूची क्रमांक एकमधील प्राणी आहे. ही सूची देशातील सर्वाधिक संकटग्रस्त प्राण्यांची आहे. त्यामुळे उपाययोजना करताना वनविभागाला अनेक मर्यादा येतात. वास्तविक पाहता, आपल्या देशापेक्षा आफ्रिकेत विपूल वन्यजीवन आहे.तेथेही एखाद्या वन्यजीवाची संख्या बेसुमार वाढून समस्या निर्माण होते. त्यावेळी सर्वतोपरी विचार करून अत्यंत कठोरपणे उपाययोजना केल्या जातात. आफ्रिकेतील झिंबाब्वेसारख्या देशातील जंगलांमध्ये हत्तींची संख्या बेसुमार वाढली, तेव्हा संख्या कमी करण्यासाठी त्यांना ठार करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेतही असा उपाय करण्याबाबत विचार सुरू आहे. आपल्याकडील वन्यजीव कायदा अतिशय कडक आहे. त्यामुळे काही उपाययोजना करताना या कायद्याचा मोठा अडथळा निर्माण होतो. सर्व उपाययोजना करताना वन विभागाने कोणाचाही विचार न करता कठोर होणे आवश्यक आहे. यात वेळप्रसंगी बिबट्यांना शेतीक्षेत्रातून पूर्णपणे बाहेर काढण्याचा विचार होणे आवश्यक आहे. अर्थात तेही वारंवार करावे लागणार आहे. कारण बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राणी ठार झाला, तर नुकसानभरपाई देऊन क्षोभ कमी करता येईल, पण सध्याच्या मर्यादित कुटुंबाच्या काळात बिबट्याच्या हल्ल्यात मानवी बळी गेल्यास हे नुकसान कधीही न भरून येणारे असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

# अंगणवाड्यांचा कायापालट: आयसीडीएस आणि 'फीडिंग इंडिया'चा स्तुत्य उपक्रम; २६ अंगणवाड्यांचे नूतनीकरण पूर्ण

पहिल्या टप्प्यातील यश पाहून आता पुढील टप्प्यात आणखी नवीन अंगणवाड्यांचे नूतनीकरण करण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. मुलांसाठी केवळ वर्गखोल्या न बांधता, तिथे खेळकर आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात आले आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सकस आहार आणि पोषक शैक्षणिक वातावरण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ग्रामस्थांचा मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

आयसीडीएस व फीडिंग इंडिया समन्वय समिती.

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

लहान मुलांच्या आरोग्याचा दर्जा सुधारण्यासोबतच त्यांना दर्जेदार पूर्व-प्राथमिक शिक्षण मिळावे, या उद्देशाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि फीडिंग इंडिया या संस्थेच्या वतीने अंगणवाडी सक्षमीकरणाचा मोठा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात २६ अंगणवाड्यांचे नूतनीकरण यशस्वीरित्या पूर्ण झाले असून, यामुळे ग्रामीण भागातील अंगणवाड्यांचे रूप पालटले आहे.

केवळ भौतिक सुविधाच नव्हे, तर मुलांच्या पोषणावरही या प्रकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. सध्या २१९ अंगणवाड्यांमध्ये दररोज सकस आणि पौष्टिक आहार पोहोचवला जात आहे. यामध्ये मुलांच्या वाढीसाठी आवश्यक असणारे घटक विचारात घेऊन दररोज दोन वेळा (नाश्ता आणि जेवण) आहार दिला जातो. जेवण ताजे आणि वेळेवर पोहोचवण्यासाठी फीडिंग इंडियाने सूक्ष्म नियोजन केले आहे. यासाठी एकूण १७ मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. या मार्गांद्वारे दुर्गम भागातील अंगणवाड्यांपर्यंतही अन्नाचे वितरण विनाविलंब केले जात आहे. या प्रकल्पाच्या यशामध्ये स्थानिक प्रशासन आणि फीडिंग इंडियाच्या प्रतिनिधींचा मोठा वाटा आहे. यामध्ये: संस्था प्रतिनिधी: दीपक निझरे, अतुल पवार आणि मनीष सिंग हे प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेवत आहेत. स्थानिक प्रशासन: गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामविकास अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभत जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि आशा वर्कर यांच्या समन्वयामुळे हा उपक्रम तळागाळातील मुलांपर्यंत पोहोचत आहे.



दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी बोरद येथील अंगणवाड्यांचे नूतनीकरणानंतर हस्तांतरण ग्रामपंचायतीकडे व करण्यात आले. यावेळी बोरद येथील सरपंच अनिता भिलाव, उपसरपंच संतोष ढोडरे, ग्रामविकास अधिकारी विजय पाटील रवींद्र भिलाव केंद्रप्रमुख दशरथ वायकर, जिल्हा परिषद शाळा क्रमांक एकचे मुख्याध्यापक रउफ शहा यांच्यासह जिल्हा परिषद शाळा क्रमांक दोन चे मुख्याध्यापक लोटन वाल्हे व सर्व शिक्षक तसेच अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होते.

# प्रभाग १४ मध्ये परिवर्तनाचा गुलाल: प्रमोद शिंदे आणि आरती रणजीत बनसोडे यांचा दणदणीत विजय

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद प्रभाग क्रमांक १४ च्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे प्रमोद शिंदे आणि आरती रणजीत बनसोडे यांनी प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाकडून विजय मिळवला.या विजयानंतर संपूर्ण प्रभागात जल्लोषाचे वातावरण असून कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत हा विजय साजरा केला.

**वाढदिवसाचे 'रिटर्न गिफ्ट'**

योगायोगाने निवडणुकीच्या निकालाचा काळ आणि प्रमोद शिंदे/रणजित बनसोडे यांचा वाढदिवस एकाच वेळी आल्याने, प्रभागातील मतदारांनी त्यांना बहुमताने निवडून देऊन वाढदिवसाचे अनोखे 'रिटर्न गिफ्ट' दिले आहे, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.



हा विजय माझा नसून प्रभाग १४ मधील प्रत्येक मतदाराचा आहे. त्यांनी जो विश्वास माझ्यावर दाखवला आहे, त्याला तडा जाऊ देणार नाही. वाढदिवसानिमित्त दिलेली ही विजयाची भेट माझ्यासाठी जबाबदारीची जाणीव करून देणारी आहे. आता फक्त विकास आणि फक्त काम हेच आमचे ध्येय असेल. – प्रमोद शिंदे / आरती रणजीत बनसोडे

जनतेने दिलेले हे प्रेम आणि विश्वास माझ्यासाठी आयुष्यातील सर्वात मोठी भेट आहे, अशी प्रतिक्रिया यावेळेस निवडून आलेल्या उमेदवारांनी दिली.

**विजयानंतरच्या महत्त्वाच्या घोषणा व विकास आराखडा**

विजयी झाल्यानंतर मतदारांशी संवाद साधताना शिंदे आणि बनसोडे यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी खालील मुद्द्यांवर भर देण्याचे आश्वासन दिले.

**पाणीप्रश्न व मूलभूत सुविधा:** प्रभागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढणार आणि रस्ते, ड्रेनेज लाईनचे आधुनिकीकरण करणार.

महिला सक्षमीकरण: आरती बनसोडे यांनी महिलांसाठी स्वतंत्र कौशल्य विकास केंद्र आणि बचत गटांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याची घोषणा केली.

**सुरक्षित प्रभाग:** प्रभागातील मुख्य चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करणार.


**स्वच्छ आणि हरित प्रभाग:** कचरा व्यवस्थापन प्रकल्पाची अंमलबजावणी करणार.

# सारंगखेडा बस स्थानक परिसरातून दुचाकी लंपास;अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

सारंगखेडा ता. शहादा येथील वर्दळीच्या बस स्थानक परिसरातून एक दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सारंगखेडा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी आकाश किसन कुवर (वय २५, रा. सारंगखेडा), ज्यांचा गावात फोटो स्टुडिओचा व्यवसाय आहे, त्यांनी आपली हिरो कंपनीची मोटारसायकल (क्रमांक MH-39 SA 8780) शनिवारी, २० डिसेंबर रोजी रात्री ९:३० वाजेच्या सुमारास बस स्थानक परिसरात उभी केली होती. अवघ्या १५ मिनिटांच्या कालावधीत, म्हणजेच रात्री ९:४५ वाजेपर्यंत, अज्ञात चोरट्याने संधी साधून ही २५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेली. आपली दुचाकी जागेवर नसल्याचे लक्षात येताच आकाश कुवर यांनी परिसरात शोध घेतला, मात्र ती मिळून आली



नाही. अखेर त्यांनी रविवारी रात्री सारंगखेडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जलालोद्दीन शेख हे करीत आहेत. सार्वजनिक ठिकाणाहून दुचाकी चोरीला गेल्यामुळे वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण असून, पोलिसांनी चोरट्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नंदुरबारच्या विद्यार्थ्यांची 'डिजिटल' झेप; महाज्योती मार्फत जेईई,नीट परीक्षार्थींना टॅबलेट्सचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

ग्रामीण आणि निमशहरी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या युगात सक्षम करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) सरसावली आहे. महाज्योतीमार्फत जेईई,नीट आणि एम एच टी -सेट या परीक्षांची तयारी करणाऱ्या निवडक विद्यार्थ्यांना दिनांकव २२ रोजी नंदुरबार येथे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते अत्याधुनिक टॅबलेट्सचे वाटप करण्यात आले.या टॅबलेट्सचे वैशिष्ट्य म्हणजे यात विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण अभ्यासक्रम, तज्ज्ञांची व्हिडीओ लेक्चर्स आणि सराव चाचण्या आधीच समाविष्ट करण्यात आल्या आहेत. यामुळे इंटरनेटची सुविधा नसली तरी विद्यार्थ्यांना कोणत्याही अडथळ्याविना अभ्यास करणे शक्य होणार आहे.या प्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी




डॉ. मित्ताली सेठी म्हणाल्या की, महाज्योतीसारख्या संस्थांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आता शहरांमधील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने आधुनिक साधने उपलब्ध होत आहेत. डिजिटल क्रांतीमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण घराघरात पोहोचले आहे. विद्यार्थ्यांनी या साधनांचा वापर केवळ अभ्यासासाठीच करून, कठोर परिश्रमाच्या जोरावर आपले ध्येय साध्य करावे. या उपक्रमामुळे आर्थिक परिस्थितीमुळे महागडे क्लासेस किंवा साधने खरेदी करू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. केवळ साधन वाटप न राहता, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मानसिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्याचा महाज्योतीचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.या कार्यक्रमाला निवासी उपजिल्हाधिकारी आशा सिंघवी, सहाय्यक आयुक्त सुंदरसिंग वसावे, तसेच अनेक मान्यवर अधिकारी, विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज शहरात समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबिर व सैनिक नोंदणी अभियान उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा, केज शहर शाखेच्यावतीने समता सैनिक दल अंतर्गत आयोजित करण्यात आलेले समता सैनिक प्रशिक्षण शिबिर व सैनिक नोंदणी अभियान केज शहरात उत्साहात पार पडले.हे शिबिर रविवार, दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी नालंदा विद्यालय, फुलेनगर,केज येथे आयोजित करण्यात आले होते.या प्रशिक्षणशिबिरात १०६ महिला,पुरुष व युवकांनी उत्स्फूर्तसहभाग नोंदवला.केज तालुक्यातील समता सैनिक दलातील समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे वार्तांकन करण्यासाठी विविध माध्यमांचे पत्रकार बांधवही उपस्थित होते. शिबिरात अमरसिंह ढाका व कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी समता सैनिक प्रशिक्षक म्हणून उपस्थित राहून शिस्तबद्ध प्रशिक्षण दिले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ड.बाबासाहेब धन्वे,



बीड जिल्हाध्यक्ष (पूर्व) व जिल्हा कोषाध्यक्ष संभाजी सोनवणे , भारतीय बौद्ध महासभा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयपाल मस्के,शहराध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा,केज हे होते.यावेळी उपस्थितां मध्ये तालुकाध्यक्ष बालासाहेब जोगदंड, महिला शाखा तालुकाध्यक्ष महानंदा गायकवाड,कार्यालयीन सचिव नंदकुमार मस्के तसेच समता सैनिक दलाचे आश्रुबा खरात, लिंबराज गायकवाड व बळीराम सोनवणे,राजू घोडके, भैय्यासाहेब आरकडे,डॉ. प्रभाकर ठोके रणजित घाडगे यांचा समावेश होता.यावेळी मार्गदर्शन करताना उज्ज्वल,सुसंस्कृत व संघटित राष्ट्रनिर्मितीसाठी युवक-युवतींनी समता सैनिक दलात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.प्रशिक्षण शिबिरामध्ये शिस्त,संघटन, सामाजिक जाणीव,बौद्ध मूल्ये तसेच राष्ट्रहिताशी निगडित विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.समता, स्वातंत्र्य,न्याय व बंधुता या तत्वांचा अंगीकार करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचे कार्य समता सैनिक दल करत असल्याचे मार्गदर्शकांनी नमूद केले.या प्रशिक्षणा मुळे युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी व संघटनात्मक जाणीव अधिक दृढ होईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल भारतीय बौद्ध महासभा, केज शहर शाखेचे पदाधिकारी व समता सैनिक दलातील कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी समता सैनिक व उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

# सहकार आयुक्त दीपक तावरे यांचे हस्ते झाला श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा गौरव



दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव | दर्शन डोंगरे**

सहकार क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व समाजाभिमुख कार्य करणाऱ्या श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेला आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने कॉसमॉस बँक व ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन यांच्या वतीने 'ग्रीन वर्ल्ड २०२५' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने पुणे येथे आयोजित सहकार मंथन या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.या गौरवपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. श्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पार पडले. तर हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त मा. दीपक तावरे (ख-ड) तसेच कॉसमॉस बँकचे बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्ष मा. सी. ए. मिलिंद काळे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी संस्थेच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक मा. ॲड. रविंद्र कानडे, मुख्य सरव्यवस्थापक श्री भिसे तसेच,एच. आर. विभाग प्रमुख श्री राहुल काटकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीने गेल्या अनेक वर्षांपासून समाजाच्या आर्थिक सबलीकरणासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत, पर्यावरणपूरक उपक्रम राबवून व सामाजिक बांधिलकी जपत सहकार चळवळीचा आदर्श निर्माण केला आहे. संस्थेच्या या सर्वांगीण, लोकाभिमुख व मूल्याधिष्ठित कार्याची दखल घेत 'ग्रीन वर्ल्ड २०२५' पुरस्काराद्वारे राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे.हा पुरस्कार म्हणजे संस्थेवरील सभासदांचा अतूट विश्वास तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या अथक परिश्रमांचे फलित असल्याचे नमूद करण्यात आले. यापुढेही संस्था सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय जबाबदारीची ही परंपरा अधिक बळकट करत सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त करत संस्थेचे संस्थापक माननीय आर. जी. कानडे साहेबांनी हा पुरस्कार सर्व सभासदांना समर्पित केला.

# बीडच्या डॉ.विक्रांत आंधळे यांचे राष्ट्रीय पात्रता (NET) परीक्षेत यश ६० हजार विद्यार्थ्यां मधून मारली बाजी

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR),नवी दिल्ली अंतर्गत कृषी वैज्ञानिक चयन मंडळा द्वारे (ASRB) आयोजित राष्ट्रीय पात्रता परीक्षेत (NET- 2025) बीडचे सुपुत्र डॉ.विक्रांत तुकाराम आंधळे यांनी 'पशु पोषण शास्त्र' (Animal Nutrition) विषयात दैदिप्यमान यश संपादन केले आहे.देशातील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत यंदा संपूर्ण भारतातून सुमारे ६० हजार विद्यार्थी बसले होते,त्यापैकी केवळ ६ हजार विद्यार्थी पात्र ठरले असून,त्यात डॉ.विक्रांत यांनी आपले स्थान निश्चित करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे.डॉ.विक्रांत हे बीड जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम आंधळे यांचे सुपुत्र आहेत.त्यांनीआपले पशुवैद्यकीय पदवीचे (B.V.Sc.) शिक्षण सातारा जिल्ह्यातील शिरवळ येथील क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयातून पूर्ण केले,तर पदव्युत्तर पदवीचे (च.त.डल.)शिक्षण ओडिसा पशुवैद्यकीय महाविद्यालयातून पूर्ण केले आहे.वडिलांच्या शैक्षणिक वारसा पुढे चालवत त्यांनी अत्यंत जिद्दीने अभ्यास करून 'पशु पोषण शास्त्र' सारख्या कठीण विषयात हे यश मिळवले आहे.या पात्रता परीक्षेतील यशामुळे डॉ.विक्रांत आंधळे आता देशभरातील विविध कृषी व पशु वैद्यकीय विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापक आणि शास्त्रज्ञ पदासाठी च्या भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत.त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून,पशु वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी व बीड जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी योग्य दिशा आणि मेहनतीच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवावे,असा आदर्श त्यांनी आपल्या कामगिरी तून घालून दिला आहे.



# पुण्यानुमोदनातून सामाजिक संदेश; गजराबाई ढालमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गजराबाई लक्ष्मण ढालमारे यांचे दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी पुण्यानुमोदन कार्यक्रम शांततामय व भावनिक वातावरणात संपन्न झाला. या पुण्यानुमोदन कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे रक्षा विसर्जन शेतात करण्यात आले, ज्यामुळे निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच उपस्थित पाहुणे व मित्रपरिवारास बुद्ध मूर्तींचे वाटप करण्यात येऊन सामाजिक व वैचारिक मूल्यांची जपणूक करण्यात आली. हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकास पात्र ठरला.जराबाई ढालमारे या सेवानिवृत्त मुख्याध्यापक दिलीप ढालमारे यांच्या मातोश्री होत. साधे, संस्कारक्षम व कर्तव्यनिष्ठ जीवन जगणाऱ्या गजराबाई यांच्या जाण्याने कुटुंबासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.पुण्यानुमोदन कार्यक्रमास नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम एक आदर्श सामाजिक उपक्रम ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव सोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी रामकृष्ण हरी नामाने बेटकबिलोली नगरी दुमदुमली

दैनिक वादळ वार्ता
**नायगांव | हानुमंत चंदनकर**

नायगांव तालुक्यातील बेटकबिलोली येथील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या हनुमान मंदिर येथे आज दिनांक २२ डिसेंबर रोजी भव्य दिव्य लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव सोहळा पार पडला विठ्ठल रखुमाईच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण आदि धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार गुणीजन गायक वादक संत महंत टाळकरी माळकरी भजनी मंडळ वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते सकाळी संत ज्ञानेश्वर संत तुकाराम महाराज यांची पालखी मिरवणूक गावभर काढण्यात आली गावातील तरुण ज्येष्ठ गावकऱ्यांनी पुढाकार घेतला हनुमान मंदिर विठ्ठल रखुमाई मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती सलग आठ दिवस भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते ह भ प दिपक महाराज बादाडे बीड यांचा काल्याच्या किर्तन व महाप्रसादानी कार्यक्रमाची सांगता झाली.



# नगरपरिषदेत वंचित आघाडीचा जलवा, प्रस्थापितांना दिला दणका

## वंचित बहुजन आघाडीने अमरावती,नांदेड,अकोला,कणकवली आणि अहिल्यानगरमध्ये आपली दखल घेण्यास भाग पाडलं


**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकीच्या रिंगणामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये अटीतटीचा सामना रंगला होता. तर कुठे महायुतीतच काँटे की टक्कर पाहण्यास मिळाली. पण, या सगळ्या लढाईमध्ये वंचित बहुजन आघाडीनेही आपली चुणूक दाखवली आहे. लोकसभेत वंचित फॅक्टरने सत्ताधाऱ्यांना घाम फोडणाऱ्या वंचित बहुजन आघाडीने नगरपरिषद निवडणुकीत चांगलंच कमबॅक केलं आहे. राज्याभरात नगराध्यक्षपद आणि नगरसेवक निवडून आले आहे. त्यामुळे वंचित आघाडीमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. नगरपरिषद निवडणूक एकीकडे महायुतीने प्रतिष्ठेची करत धुरळा उडवून दिला. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये चांगलीच चढाओढ पाहण्यास मिळाली. पण, या लाटेतही वंचित बहुजन आघाडीने अमरावती, नांदेड, अकोला, कणकवली आणि अहिल्यानगरमध्ये आपली दखल घेण्यास भाग पाडलं. अमरावतीमध्ये वंचित बहुजन आघाडीने नगराध्यपद पटकावलं आहे. अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या प्रियंका निलेश विश्वकर्मा यांची नगराध्यक्षपदी निवड झाली आहे. तर अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी नगरपरिषद नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवार अख्तर खातुन यांचा विजय झाला आहे. दरम्यान, नगरपंचायत आणि नगर परिषद निवडणुकांमध्ये फुले,शाहू,आंबेडकरवादी तसेच आरएसएसच्या राजकारणाच्या विरोधात असलेल्या मतदारांनी वंचित बहुजन आघाडीला मोठ्या प्रमाणात मतदान करून भक्कम पाठिंबा दिला असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. सोलापूरमध्ये भाजपला मोठा धक्का; पंढरपूर, मंगळवेढा, अकलूज, करमाळ्यात कमळ कोमेजलं इंदापुरात हर्षवर्धन पाटलांच्या साथीच्या जोरावर अजितदादांना थेट चॅलेंज दिलेल्या गारटकरांचं काय झालं? संपूर्ण निकाल

निवडणुकांमध्ये मिळालेल्या यशामागे महिला आघाडी, युवा आघाडी, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे कार्यकर्ते तसंच आजी – माजी पदाधिकारी आणि विशेषतः युवा कार्यकर्त्यांचा मोठा वाटा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सर्वांनी पुढाकार घेऊन केलेली मेहनत बहुप्रतिक्षित यशाचे कारण ठरल्याचेही त्यांनी नमूद केले. हे यश सर्वांच्या सहकार्यामुळेच शक्य झाले असून, निवडून आलेल्या प्रत्येक नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचे त्यांनी अभिनंदन केलं आहे.

वंचित बहुजन विकास आघाडीच्या विजयी उमेदवाराची यादी

– नागपूरमध्ये वाडी नगरपरिषदेत सुनीता मेश्राम, शीतल नंदागवळी आणि राजेश जंगले विजयी
– कणकवली नगरपंचायत निवडणूक – वंचित बहुजन आघाडीचे (सत्यशोधक सेक्युलर फ्रंट, महाराष्ट्र) उमेदवार लुकेश कांबळे विजयी
– वाडी नगरपरिषदेत राजेश जंगले यांचा विजय, या ठिकाणी आणखी ४ उमेदवार विजयी
– घाटंजी नगरपरिषद पोटनिवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार पायल संघपाल कांबळे यांचा विजय
बुलढाणा: जळगाव जामोद नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. १ (ब) मधून डॉ. मोहम्मद सलीम मोहम्मद सबीर विजयी
शेगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत सीमा वोवे यांचा विजय
जामखेड नगरपरिषदेत संगीता भालेराव यांचा दणदणीत विजय
– अकोट : प्रभाग क्रमांक ९ च्या पोटनिवडणुकीत इम्रान खान पठाण यांचा विजय
बाळापूर नगरपरिषदेवर वंचित बहुजन आघाडीचे १० उमेदवार विजयी
– नांदेड : कंधार नगर पालिकेत दिलीप संतराम देशमुख विजयी
– देवळाली प्रवरात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष चोळके विजयी
– हिवरखेड नगरपरिषदेत सविता सुनील इंगळे यांचा विजय
– बार्शी टाकळी नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग १६ मधून शेख साबीर शेख अमीन विजयी
– चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती नगरपालिकेत जयश्री दुर्योधन यांचा नगरसेवकपदी विजय
– अक्कलकोट नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग ११ मधून वंचितच्या उमेदवार प्रियांका मडीखांबे विजयी
– अहिल्यानगर – वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संतोष चोळके विजयी
– वंचित बहुजन आघाडी संगमनेर सेवा समिती पुरस्कृत – प्रभाग क्रमांक ९ मधील अमजदखान उमरखान पठाण आणि विजया जयराम गुंजाळ विजयी
– मुर्तिजापूर नगरपरिषदेत प्रभाग २ उमेदवार शशिकला सोळंके विजयी
– यवतमाळ नगर परिषदेमध्ये उमेदवार आनंद गायकवाड विजयी
– कर्जत जामखेड नगरपरिषद मध्ये अॅड. अरुण जाधव विजयी
भद्रावती नगरपालिकेत राखी संतोष रामटेके सलग तिसऱ्यांदा विजयी
मूर्तिजापूर नगरपरिषदेत वंचित बहुजन आघाडीचे तसवर खान विजयी
– वंचित बहुजन आघाडीच्या तेल्हारा नगरपरिषद नगरसेवक पदाच्या कान्होपात्रा फाटकर विजयी
– अकोला बाळापूर नगरपरिषदेत संजय उमाळे विजयी
– भूम नगरपरिषदेत रिमा ब्रह्मदेव शिंदे यांचा विजय
– धाराशिवमध्ये भगूर नगरपरिषदेत वंचित बहुजन आघाडीचे अजय वहाने विजयी
– हिवरखेड नगरपरिषदेत सविता सुनील इंगळे



## जागतिक सहकार वर्षानिमित्त तुळजाभवानी अर्बन च्या उत्कृष्ट सहकार कार्याचा गौरव

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । दर्शन डोंगरे**



तुळजाभवानी अर्बनसाठी कालचा दिवस कौतुकाची एक थाप देणारा ठरला. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे येथे, जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील अनुभव, व आव्हाने यावर विचारमंथन घडवून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन २०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी ठेवीदारांच्या हिताचे रक्षण,पारदर्शक व उत्तरदायी व्यवस्थापन आणि सहकार तत्त्वांचे उत्कृष्ट पालन याची दखल घेत तुळजाभवानी अर्बनचा ग्रीन वर्ल्ड को प्राइड पुरस्काराने गौरव करण्यात आला.यावेळी महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त मा.श्री. दीपक तावरे, 'बोर्ड ऑफ मॅनेजमेंट'चे अध्यक्ष मा. श्री. मिलिंद काळे ग्रीन वर्ल्डचे अध्यक्ष श्री.गौतम कोतवाल यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अशोक शेजूळ व श्री. सुमित शेंडगे तसेच मुख्य अधिकारी श्री. भास्कर गवळी आणि श्री. अशोक मगर साहेब उपस्थित होते.हा पुरस्कार केवळ आमच्या संस्थेच्या यशाची पावती नाही, तर आमच्या सभासदांचा, ग्राहकांचा आणि खातेदारांचा विश्वास तसेच कर्मचाऱ्यांच्या परिश्रमांचे सन्मानचिन्ह आहे. हाच विश्वास आम्हाला भविष्यात नव्या जोमाने काम करण्याची नवी उमेद देत राहील.

## अक्कलकुवा-मोलगी रस्त्यावर देवगोई घाटात भीषण अपघात; दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**




अक्कलकुवा ते मोलगी दरम्यान असलेल्या देवगोई घाटाजवळ दुचाकी घसरून झालेल्या भीषण अपघातात एका २३ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. राहुल सिपा वळवी (रा. पांढरामाती, ता. अक्कलकुवा) असे मयत तरुणाचे नाव असून, याप्रकरणी मोलगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २१ डिसेंबर) सकाळी ११ वाजेपूर्वी राहुल वळवी हा आपल्या ताब्यातील हिरो होंडा स्प्लेंडर (क्रमांक चक१३ इइ ४९२५) या दुचाकीने मोलगीकडून अक्कलकुवाकडे जात होता. अक्कलकुवा-मोलगी रस्त्यावरील देवगोई घाटाच्या पुढे ही घटना घडली. प्रत्यक्षदर्शी आणि पोलीस तपासातील माहितीनुसार, राहुल याने आपली दुचाकी भरधाव वेगाने आणि अविचाराने चालवल्यामुळे गाडीवरून त्याचे नियंत्रण सुटले. परिणामी, दुचाकी रस्त्यालगत असलेल्या चारीमध्ये जाऊन आदळली. या भीषण अपघातात राहुलला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

या प्रकरणी अक्कलकुवा पोलीस ठाण्यातून अकस्मात मृत्यूच्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर, मोलगी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) आणि ३२४(४) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मोलगी पोलीस ठाण्याचे पोहेकॉ ६९२ किरण माधवराव धनगर यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. सपोनि दीपक पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ २५ अरुण देविदास सुर्यवंशी या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## माळेगाव यात्रेत केजच्या राजाचा बोलबाला, आण्णासाहेब पाटलांच्या घोड्याने यात्रेकरूंचे लक्ष वेधले

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



नांदेड जिल्ह्यातील माळेगाव या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या यात्रेतील प्रदर्शनात केज शहरातील शिवसेना एकनाथराव शिंदे पक्षाचे केज तालुकाप्रमुख आण्णासाहेब सुरेश तात्या पाटील यांचा राजा नावाच्या घोड्याने सर्वांचे लक्ष वेधले.अवघ्या सव्वा दोन वर्षाचे वय असलेला चपळ,गुणी,उमदा घोडा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.यावेळी अनेकांना राजासोबत फोटो काढायचा मोह आवरता आला नाही.परंपरेने गेल्या तीस वर्षा पासून केज येथील पाटलांची राहोटी माळेगाव येथील यात्रेत असते.प्रदर्शना दरम्यान केजचे मनोज दांगट पाटील,आकाश पाटील, दत्ता काकडे,बाळासाहेब कवठेकर,जवळबन चे सरपंच प्रमोद करपे, अमोल वळसे,सुनील देशमुख,रवी साखरे यांच्यासह गावकऱ्यांनी भेट देऊन कौतुक केले आहे.

## सेंट ॲण्ड्र्यूज हायस्कूल फॉर गर्ल्स कॅम्प येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे । शंकर जोग**



सेंट ॲण्ड्र्यूज हायस्कूल फॉर गर्ल्स, कॅम्प पुणे येथे शालेय वार्षिक स्नेहसंमेलन पारितोषिक वितरण समारंभ व विविध गुणदर्शन शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ चा कार्यक्रम उत्साहात पार पडला यावेळी या कार्यक्रमास भरपूर पालकांनी प्रतिसाद देत कार्यक्रम यशस्वी केला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटीचे सचिव- डॉ,लाल बहादूर कांबळे, अनिल गडकरी सर, नाशिक धर्मप्रांताचे धर्मगुरू रा.रेव्ह. प्रदीप कांबळे सुप्रिया पवार, मेघा माहीम कर, सुधीर साळुंके, मार्शल बनसोडे, उपस्थित होते.शिवसेनेचे शिक्षक शिक्षकेतर अध्यक्ष, पुणे येथील श्री.अनिल गडकरी (सर) यांनी देखील विद्यार्थिनींना प्रेरणा दिली तसेच हुशार व अष्टपैलू विद्यार्थिनीला फिरता चषक देत आपल्या आईच्या स्मरणार्थ तर दरवर्षी देण्याचे जाहीर केले, हा फिरता चषक इयत्ता दहावीची विद्यार्थिनी जलिना मावळी हिने पटकावला.शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.अर्चना साठे यांनी शालेय वार्षिक अहवालाचे वाचन केले.विद्यार्थिनींनी विविध व नृत्याविष्कारातून कलागुण सादर केले, सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका मारिया देठे यांनी केले व आभार सीमा कांबळे यांनी मानले,

## कापूस,सोयाबीन व तूर पिकांना योग्य भाव मिळावा यासाठी २५ डिसेंबरला शेतकरी हक्क मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

### माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**



राज्यातील शेतकरी सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून जात असून शेतीमालाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. विशेषतः कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने गुरुवार, दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बीड येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती मोर्चा संयोजकांनी दिली.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत शेतकऱ्यांच्या कापसाला किमान १२,००० प्रति क्विंटल भाव देण्यात यावा.

सोयाबीनसाठी किमान ७,००० प्रति क्विंटल दर निश्चित करण्यात यावा.

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (CCI) कडून होणारी अडवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा.

हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या बाजार समित्या व व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या शेतमालाचा विक्रीदर व खरेदीदरातील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा.

शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, सबसिडी, अनुदान व पीक विमा यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी.

या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर २०२५ निमित्त जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात यावा-अनिल बोर्डे



**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

दिनांक २२ /१२/ २५ रोजी ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड जिल्हा उपाध्यक्ष यांनी गेवराई तालुक्याच्या वतीने मा. तहसीलदार संदीप जी खोमणे यांना निवेदन देण्यात आले. ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने शासन परिपत्रकाप्रमाणे राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर २०२५ निमित्य विविध उपक्रम राबविण्यात यावेत. अशी मागणी करण्यात आली. उद्देश;- ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत ग्राहकांना त्याच्या हक्का बद्दल आणि जबाबदाऱ्याबद्दल जागरूक करणे. बाजारात होणाऱ्या फसवणुकीबद्दल आणि भेसळी बद्दल ग्राहकांना माहिती देणे. ग्राहक मंचाच्या माध्यमातून तक्रार निवारण प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन करणे. ग्राहकांना ग्राहक पंचायत च्या कार्यात सहभागी प्रोत्साहित करणे. सुचवलेले उपक्रम: शाळा/ कॉलेज स्तरावर ग्राहक हक्क व जबाबदारी आधारित प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धा घेणे. स्थानिक वृत्तपत्रे, सोशल मीडिया आणि जाहीर सभातून जनजागृती करणे. ग्राहक हक्क आधारित माहितीपत्रके व पोस्टर्स तयार करून वाटणे. ग्राहक पंचायत प्रतिनिधी द्वारे मार्गदर्शन शिबिर आयोजित करणे. याबाबत मा. तहसीलदार मा.संदीप जी खोमणे यांना निवेदन देण्यात आले व चर्चा झाली. तसेच याबाबत श्री गजानन मोरे साहेब पुरवठा नायब तहसीलदार यांच्याशी कार्यक्रमाबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली .याप्रसंगी गेवराई ग्राहक पंचायत तालुकाप्रमुख प्रा. भानुदास फलके, मोहनराव राजहंस, संतोष कापसे आदी हजर होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077